# कोरोना—१९: महिलांची भूमिका आणि कौटुंबिक वातावरण—समाजशास्त्रीय विश्लेषण

**डॉ. बिभीषण करे**, समाजशास्त्र विभागप्रमुख, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.
email- bibhishank@rediffmail.com

**प्रस्तावना**: प्रत्येक समाजात नेहमी एक वंचित वर्ग असतो. नेहमी अशा वंचित वर्गाला दुयमतेची जबाबदारी आणि वागणूक मिळत असते. स्त्री आणि पुरूष यामधील लिंगभेद, श्रमभेद, हक्कभेद, दुयमत्व सर्वश्रुतच आहे. भारतीय समाजात पुरूषप्रधानता असल्याने कुटुंबसंस्थेतही अधिकारशाही असणारा वर्ग म्हणजे पुरूष असतो. अशावेळी कुटुंबातील स्त्रीवर्गाला मिळणारी वागणूक वंचिततेची असते. लिंगभावाच्या नजरेतून पाहिल्यास स्त्रीवर्गावर होणारे अन्या आणि अत्याचार भयानक आहेत. कोविड१९ च्या भयानक परिस्थितीनंतर सामाजिक आणि विशेषत: कौटुंबिक स्तरावर महिलावर होणारे अत्याचाराचे प्रमाण अधिक वाढलेले दिसते. यामध्ये मानसिक हिंसा, मारहाण, हक्कपासूनची वंचितता, विनयभंग, बलात्कार, हिनतेची वागणूक, कौटुंबिक छळ, आर्थिक परावलंबन, महिलांच्या आर्थिक हालचालीवर नियंत्रण, स्त्रीच्या शरीरावरील कटुंबातील वाढते नियंत्रण अशा अनेक स्त्रीसंबधीत प्रश्नांचा समावेश होतो. कोविड १९ च्या टाळेबंदीच्या कालावधीत स्त्रीयांचे प्रश्न आणि त्यांची हक्काबाबतची वंचिततेचे समाजशास्त्रीय विश्लेषण प्रस्तुत शोधनिबंधात प्रकट आहे.

**१.१ पारिभाषिक शब्द**: सबलीकरण, कोविड, मानवाधिकार आदि.

**१.२प्रस्तावना**: समाजात स्त्री आणि पुरूष एकाच रथाची दोन समान चाके आहेत. दोन्ही घटकांच्या समानतेच्या कार्यप्रणालीवरच समाजचा विकास आणि प्रगती अंवलबून असते. आजघडीला कोरोना—१९ विषाणू आणि जगाची हतबलता अतिभयानक आहे. लॉकडाउनमध्ये महिलांवर वाढलेला अत्याचार ही समस्या शब्दश: जागतिक आहे. नैसर्गिक आपत्तीला तोंड देताना संकटकाळाला प्रतिसाद देताना स्त्री आणि पुरूष अशी असणारी लिंगधिष्ठीत घडवणूक दिसून येते. कोरोना विषाणूच्या काळात घराच्या बाहेर कार्यरत असणारी पुरूषमंडळी टाळेबंदीच्या काळात घरात आहे. दोनपेक्षा अधिक महिन्यांचा काळ घरात असणाऱ्या पुरूषमंडळींसाठी समाधानाचे साधन आणि गरजपूर्तीचे माध्यम म्हणून स्त्रीकडे पाहिले गेले, हि भारतीय समाजाची वास्तविकता आहे. आजही पुरुषप्रधान व्यवस्थेच्या विचारांच्या चौकटीत स्त्रियांना अजूनही दुय्यम स्थान आहे. “स्त्रीला सबल करणे ही एक प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया स्त्रीला इतर उपेक्षित घटकांना दूर ठेवणाऱ्या सुव्यवस्थित प्रवाहाचे स्वरूप बदलून व नवी दिशा देऊन कृतीत आणता येते. तेव्हा प्रामुख्याने स्त्रीला सबल करण्यासाठी शक्ती देण्याचे प्रयास केले तरच ती अधिक गतीने प्रगत होऊ शकेल.” भारतीय समाजात स्त्रियांना बरेच अधिकार मान—सन्मान मिळत होते. वैदिक काळानंतर समाजात सामाजिक रूढींना महत्त्व प्राप्त झाले. ज्यामुळे परिणामत: स्त्रियांचे अधिकार, प्रतिष्ठा कमी—कमी होत गेली. पुरुषप्रधान समाजाने स्त्रियांचे अधिकार हिसकावून घेतले, तिचे सतत शोषण केले गेले आणि कोरोना विषाणुच्या काळात स्त्री वर्गांवर होणारे अत्याचार आणि कुटुंबात होणारी छळवणूक सामाजिक समस्यंच्या तिव्रतेत भर टाकणारी आहे. प्रस्तुत शोधनिंबधात स्त्रीवर्गावर कोरोना कालावधी होत असलेल्या अत्याचाराविषयीचा लेखाजोखा मांडण्यात आला आहे.

**१.३ शोधनिबंधाचे उदद्देश, पद्धतीशास्त्र आणि सैद्धांतिक दृष्टिकोन**: प्रस्तुत शोधनिबधांमध्ये कुटुंबाचा महत्वाचा घटक असलेल्या स्त्रीदर्जाचे अध्ययन करून कोरोनाकालावधीत महिलांच्या समस्या, अडचणी आणि कौटुंबिक दर्जाचे अध्ययन करणे तसेच प्रस्तुत कालावधीत त्यांच्या कामाचे स्वरूप, कुटुंबातील स्थान, मानसिक स्थिती, महिलांची भूमिका, कामाचा ताण आणि त्यांच्या परिस्थितीसापेक्ष निर्माण झालेल्या समस्यांचे अध्ययन करण्यात आले आहे. मॅकआयव्हरने म्हटले आहे की, ‘सामाजिक संबधातील परिवर्तन म्हणजे सामाजिक परिवर्तन होय.’ यानुसार कोरोना कालावधीत स्त्रीवर्गाच्या भुमिका आणि दर्जातील बदल याबाबतचे अध्ययनही प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आले आहे. यासाठी दैनिके, पाक्षिके, मासिके, स्त्रीवादी साहित्य, संदर्भ पुस्तके आणि क्रमिक पुस्तकांचा आधार घेण्यात आला आहे. प्राथमिक

तथ्ये प्राप्तीसाठी काही महिलांची सहेतूक नमुना निवडीचा आधार घेवून चर्चा आणि निरिक्षणाद्वारे अध्ययन करण्यात आले आहे.

**टॉलकॉट पार्सन्सस्** म्हणतो, 'स्त्री आणि पुरूषांची भूमिका ही लिंगभावात्मक असून पुरूषांची भूमिका ही साधनवादी कार्यात्मक आहे तर महिलांची भूमिका ही अभिव्यक्त होण्याची आहे.' कोविड कालावधीत स्त्रीयांना कार्यरत असताना भूमिका संघर्ष करावा लागल्याचे चित्र आहे. उपभोगवाद टिकविण्यासाठी एका अर्थाने कुटुंबव्यवस्था हातभार लावते असे चित्र एकीकडे दिसून येते. **जहाल स्त्रीवाद्यांची** अशी भूमिका आहे की, 'उभयलिंगी शरीरसंबधास मान्यता देणा—या विवाहसंस्था आणि कुटुंबव्यवस्था हया मुख्यत: स्त्रीशोषणास आणि स्त्रीअत्याचारास कारणीभूत आहेत. पितृस्थानीय संस्था ही सत्ता, वर्चस्व, पदसोपानता आणि स्पर्धा यांनी युक्त असते.'

**१.४ कोरोना विषाणू —महिलांची भूमिका आणि कौटुंबिक वातावरण**: आजही स्त्रियांच्या वाट्याला पुरुषांपेक्षा भिन्न, दुय्यम, कनिष्ठ आणि विषम जीवन येते. कोरोना विषाणूप्रादुर्भाव काळात बेरोजगारी, मानसिक अगतिकता, भुकेचा प्रश्न, व्यवसाय आणि उद्योगाचे नुकसान याबरोबरच कुटुंबात होणारी स्त्रियांची कुचंबणा आणि छळ हा संशोधनाचा विषय बनला आहे. स्त्रीयांच्या वाटयाला येत असलेले वाईट अनुभव यामध्ये लैगिंक छळ, विनयभंग, कुटुंबांतर्गत लैंगिक इच्छापूर्तीची अपेक्षा, शाब्दीक छळ, कामाचा ताण, आरोग्याचा प्रश्न, कुटुंबाची काळजी अशा शरीर आणि मनाशी निगडीत असणाऱ्या अनेक अडचणी निर्माण झालेल्या आहेत. हिंदू समाजात स्त्रियांना ज्ञान, शक्ती व संपत्तीचे प्रतीक मानले जाते. या प्रतिकावरून हिंदू समाजात स्त्रियांचे स्थान हे सरस्वती, लक्ष्मी, दुर्गा असे होते. स्त्रियांना पुरुषांची अर्धांगिणी मानले जात असे. कोणत्याही शुभकार्यात स्त्रीशिवाय ते काम पूर्ण होत नसे म्हणूनच म्हटले जात होते की, *"नारी परिवार की नींव है।"* जगामध्ये हिंदू संस्कृती श्रेष्ठ मानली जात असतानाही समाजात कोविड—१९ या काळात स्त्रियांची स्थिती अतिशय केविलवाणी झाली आहे. कोरोनाच्या महामारीमुळे अडीच महिन्यापासून अधिक काळ अनेकजण घरातच अडकून पडले होते. व्यवसाय, नोकरीचा ताण, हाताला काम नसल्याच्या मनस्थितीत शुल्लक कारणावरून पतीपत्नी गृहकलह वाढला. त्याचा परिणाम म्हणून अनलॉक होताच पोलीस ठाण्यामध्ये छळाच्या तक्रारी सुरू झाल्या. जून महिन्यात अशा १६ विवाहितांनी ठाण्याची पायरी चढली. तसेच पुन्हा एकदा आठवडाभराचा लॉकडाउन करण्यात आला आहे अचानक घोषित झालेल्या लॉकडाउनमुळे घरातच बंदिस्त झाले. सामाजिक संपर्क तुटला, व्यवसाय—व्यवहार ठप्प झाले. बहुसंख्य लोकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. यासर्व बाबींमुळे मानसिक, भावनिक आणि सामाजिक वर्तुणुकीवर वाईट परिणाम होत आहे. विशेषत: स्त्रीयांमध्ये चिंता, निद्रानाश, चिडचिड नैराश्य आणि भविष्याबदद्ल अनिश्चितता मनात घर करू पाहत आहेत. पुरूषप्रधान व्यवस्थेत इच्छा आणि गरजपुर्तीच्या नावाखाली हिंसक प्रवृत्ती वाढिस लागल्या आहेत. त्याचा परिणाम कौटुंबिक वातावरणावर होत आहे. विशेष करून पतीपत्नीमध्ये झालेले वादही ठाण्यापर्यत पोहचत आहेत. त्यात एप्रिल आणि मे महिन्यात त्याची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात आली. परंतु जून महिन्यात त्यामध्ये सूट देण्यात आली. लॉकडाउनमध्ये सूट दिल्यावर ठाण्यामध्ये गृहकलहाच्या तक्रारींचा ओघही वाढला. मे महिन्यात बलात्काराचे चार, विनयभंगाचे गुन्हे नोंदविण्यात आले. आणि कौटुंबिक छळाचे प्रकारही वाढले. कौटुंबिक काम करणा—या महिलांच्या समस्या कमी न होता त्यामध्ये वाढच झालेली दिसून येते.

**१.५ महिलांचे प्रश्न आणि सामाजिक वातावरणाचे विश्लेषण:** जगातील प्रत्येक समाजात स्त्री—पुरुष विषमता कोणत्या ना कोणत्या प्रकारे अस्तित्त्वात आहे. पुरुषप्रधान मूल्ये, स्त्रियांची दुय्यम भूमिका आणि दुय्यम स्थान चिंतेचे विषय आहेत. कोरोना कालावधीत कुटुंबातसुद्धा विषमतेमुळे होणारे स्त्रियांचे शोषण, त्यातून निर्माण होणाऱ्या त्यांच्या मागासलेपण व अत्याचाराचे प्रश्न हे मानवी अधिकाराचा दृष्टीने चिंतनाचा विषय आहे. लॉकडाउन संपेपर्यंत माझ्या घराऐवजी दुसरीकडे कुठेतरी राहण्याची माझी सोय करा, असा ईमेल एका महिलेने **राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रेखा शर्मा** यांना केला, यामुळे लॉकडाउनमधील सुखी कुटुंबाचे भारतीय वास्तव उघड झाले. घरातल्या मारहाणीला मी कंटाळले आहे. पोलिसांकडे

तक्रार करूनही काही उपयोग नाही. कारण पोलिसांनी नवऱ्याला पकडून नेल, तरी सासरचे लोक माझयावर अत्याचार करतील, त्यापेक्षा मीच घरात थांबत नाही, असं संबधीत महिलेनं केलेल्या तक्रारीत केलेल होत. घरातच महिलांचा छळ ही भारतीय समाजात घडणारी आणि अधिसंमत मानली जाणारी सामाजिक रूढ आहे. राष्टीय महिला आयोगाने मार्च २०२० च्या पहिल्या आठवडयात घरगुती हिंसाचारासंबधी अहवाल प्रसिद्ध केला आहे, त्यामध्ये महिलांच्या तक्रारी आणि महिला कौटुंबिक हिंसाचारात दुपटीने वाढ झाल्याचे दिसून आलं. **संयुक्त राष्ट्रांच्या महासचिव ॲटोनियो गूटेरेस** यांनी देखील लॉकडाउनच्या काळात महिलांवर होणा—या घरगुती हिंसाचारावर चिंता व्यक्त केली. महिंलासाठी सर्वात सुरक्षित मानल्या जाणाऱ्या कुटुंबामध्येच महिंला अत्याचार आणि हिंसाचारात वाढ झाल्याचे चित्र आहे. **अमर उजालाच्या एका मुलाखतीत राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रेखा शर्मा** म्हणतात, 'महिलांना बऱ्याच वेळेला कळत नाही की, त्यांच्यावर हिंसाचार होतोय.' **ज्येष्ठ विधीज्ञ व महिला हक्क कार्यकर्ती वृन्दा ग्रोवर यांच्या मते**, 'देशभरात लॉकडाउनमुळे महिलांवरील हिंसाचार वाढण्यात भर पडली आहे. स्त्रीवर पतीचा अधिकार असतो आणि त्याला तो अधिकारी गाजविण्याचा अधिकारी आहे, अशा प्रकारची सामाजिक मानसिकता आजही दिसून येते.' कोरोनामुळे घरकाम करणा—या अनेक महिलांचे काम बंद झाली, याचा परिणाम म्हणून दिवसभर घरात थांबणे आले आणि व्यसनाधिन पतीकडून मारहाण, टोमणे मारणे, पैशाचा तगादा लावणे अशाही घटनांत वाढ झालेली आढळते. अगदी सिरीया, अमेरिका, ऑस्टेलियासारख्या देशातही महिलांवरील अत्याचार कोरोनाच्या काळात वाढलेले दिसतात. लॉकडाउनच्या काळात कुटुंबव्यवस्था मजबूत होईल ही खोटी आशा ठरलेली दिसते. कोरोनाच्या काळात महिलांवर होणारा हिंसाचार हा केवळ अशिक्षितांमध्ये नाहीत तर सुशिक्षितांमये तेवढयाच प्रमाणात आढळून येतो आहे. **संयुक्त राष्टांच्या महासचिव ॲटोनिओ गुटेरेस** यांनी देखी लॉकडाउनच्या काळात महिलांवर होणाऱ्या घरगुती हिंसाचारावर चिंता व्यक्त केली आहे. महिलांना स्वत:च्या घरातच सर्वाधिक असुरक्षित वातावरणाचा आणि भितीचा सामना बहुतांश मुलींना आणि महिंलांना करावा लागतो. भारतामध्ये हिंदू समाजात स्त्रियांना ज्ञान, शक्ती व संपत्तीचे प्रतिक मानले जाते. या प्रतिकावरून हिंदू समाजात स्त्रियांचे स्थान सरस्वती, दुर्गा, लक्ष्मी, महाकाली असे होते. त्यांची पूजा केली जाते. समाजात स्त्रियांना पुरुषाची अर्धांगिणी मानले गेले. इतकेच नव्हे तर 'स्त्री राष्ट्राचा पाया आहे. ज्या राष्ट्रात तिचा मान सन्मान केला जातो तेच राष्ट्र एक आदर्श व प्रगतीशील राष्ट्र होईल,' असेही स्त्रीबद्दल विवेचन करून त्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले असताना कोरोना काळात कुटुंबात स्त्रीयांची होणारी छळवणूक भयानक आहे. लॉकडाउनच्या शिथिलतेनंतर भारतात अनेक महिलांनी पोलिसांकडे कौटुंबिक छळाच्या तक्रारी दाखल केल्या आहेत. यामध्ये विशेषत: कुटुंबांतर्गत बलात्कार, मारहाण, विनयभंग, मानसिक छळ अशा अनेक प्रकारांचा समावेश त्यामध्ये आहे.

**१.६ निष्कर्ष विश्लेषण**: कोविड १९ विषाणूच्या प्रार्दुभाव कालावधीत स्त्रीयांचे परावलंबित्व वाढले आहे. स्त्रीसंबधीत अनेक व्यक्तिगत आणि कौटुंबिक सामाजिक समस्यांची तिव्रता वाढलेली आहे. कुटुंबातील सामाजिक, सांस्कृतिक अस्थिरतेमुळे आघातग्रस्त आणि आघातप्रवण बनल्या आहेत. कोविड १९ काळातील स्त्रीची अवस्था पाहून स्त्रीवाद्यांनी कुटुंबप्रमुखाला कटुंबाचा पालनपोषणकर्ता समजण्यास नकार दिलेला दिसतो.

**१.७ शिफारशी आणि उपाययोजना**: प्रस्तुत शोधनिबंधात कोरोना विषाणू कालावधीत स्त्रीची भूमिका लक्षात घेतल्यावर महिलांना दिले जाणारे स्थान लक्षात येते. यासाठी काही शिफारशी आणि उपाययोजनेसाठी सदरील मुद्दे सूचविण्यात आले आहेत. प्रामुख्याने स्त्री उन्नती, सबलीकरण आणि आत्मसुरक्षा हेतू पोलिसामार्फत 'भरोसा सेल' सुरू करणे. स्त्रीबरोबरच पुरूषांचेही कौटुंबिक समुपदेशन करणे. कौटुंबिक सल्ला केंद्राच्या माध्यमातून स्त्रीसंबधीत गैरसमज दुर करण्याचे प्रयत्न करणे अतिशय आवश्यक आहे. कोरोनाच्या शिथिलतेनंतर पिडीत महिलांना आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक इत्यादी क्षेत्रांमध्ये महिलांना विशेष संधी देऊन त्यांचा विकास करणे स्त्रियांचे हक्क मान्य करणे व त्या हक्कांचा लाभ घेण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करून स्त्रियांच्या अंगी असलेल्या क्षमतांचा विकास करण्याची गरज

आहे. उपलब्ध संधीचा लाभ घेण्याची पात्रता विकसित झाल्याशिवाय देऊ केलेली संधीची समानता ही अर्थपूर्ण होणार नाही. महिलांना विविध बंधनातून, समस्येतून मुक्त करणे ही काळाची गरज आहे. भारतीय समाजात महिला ही राष्ट्राची संपत्ती व शक्ती आहे. तिचा योग्य वापर केल्यास निश्चितच तो देश प्रगतीपथावर जाईल. महिलांच आर्थिक—सामाजिक स्वावलंबत्व, पुरूषांच महिलांच्या अस्तित्वाविषयी आणि हक्कांविषयी जागृत झालेलं भान आणि दोहोंना परस्परांच्या विषयी असणारा आदर, हि त्रिसुत्री आकारात आली पाहिजे.

भारतात राष्ट्रविकासासाठी स्त्री—पुरुषांचा समतोल विकास झाला पाहिजे. भारताच्या दृष्टिकोनातून महिलांच्या सबलीकरणाची संकल्पना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे सर्वसाधारणपणे महिला सबलीकरण म्हणजे स्त्री नावाच्या भारतीय समाजातील जो घटक आहे. त्याला आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपल्या सूक्ष्म क्षमता प्रत्यक्षात वापरता येतील, असा समाज निर्माण करणे होय. आर्थिक, सामाजिक, राजकीयदृष्ट्य केल्या जाणाऱ्या सुधारणांमधून स्त्री—पुरुषामध्ये व्यक्ती म्हणून समाजात स्त्रियांच्या दृष्टीने परिवर्तन होणे आवश्यक आहे. तसेच 'महिला सक्षमीकरण' ही संकल्पना विविध संदर्भाने भारतीय समाजात रूजविण्याची गरज आहे. स्त्रीचे समाजातील असणारे दुय्यमत्व हेच मुळाशी कारणीभूत असून स्त्रीचे असणारे हे दुय्यमत्व व्यवस्थात्मक स्वरूपाचे आहे आणि असे दुय्यमत्व सर्व समाजात असते. या गृहितकावरच आधारित महिला सबलीकरणाची प्रक्रिया राबविण्याची आवश्यकता आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रातील असमानतेमुळे महिला शक्ती मागे पडली तेव्हा या शक्तीचा सदुपयोग समाजविकासासाठी करून पुरुषांच्या तुलनेने स्त्रियांना समान अधिकार मिळून त्यांना आपण माणूस म्हणून जीवन जगावे हि धारणा राबविण्याची गरज आहे. स्त्री—पुरुष समतेसाठी दोन गोष्टींची जरूरी असते एक म्हणजे स्त्रियांचा विकास आणि सक्षमीकरण. स्त्रियांच्या आत्मशक्तीचा विकास झाला तरी घरात आणि घराबाहेर ती क्रियाशील असणे, तिच्या मताला किंमत असणे, यासाठी आर्थिक आणि सामाजिक पाठबळ असणे जरूरीचे आहे. समाजातील पुरुषप्रधान संस्कृतीमुळे पुरुषी वर्चस्व जास्त आहे तेव्हा ते कमी होऊन अधिकारांची समान वाटणी होणे महत्त्वाचे आहे. यामुळे समाजाची वाटचाल एका दिशेने होण्यास मदत होईल. महिलांना पुरुषाप्रमाणे समान भूमिका व समान सत्ता कोणत्याही देशामध्ये मिळत नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. त्यामध्ये लिंगभेदभाव केला जातो. महिलांची उपेक्षा केली जाते व त्यातून सत्ता व संधीपासून दूर ठेवले जाते. यामुळेच आंतरराष्ट्रीय किर्तीच्या महिला अभ्यासिका **नॅन्सी रिले** म्हणतात, "Gender refers to the different roles men and women play in society and to the relative power they wield, while gender is expressed differently in different societies, in no society do men and women perform equal roles or hold equal positions of power."

**संदर्भसूची**:

1.USA Report १९९४:२

2.Sharlene Nagy Hesse-Biber (2007): Handbook of Feminist Research Theory and Praxis`, Sage Publication, New Delhi.

3.Zubair Meenai, (2010): Women`s Empowerment and Microcredit Emerging Spaces for Social Work Practice, The Indian Journal of Social Work, Tata Institute of Social Sciences Publication, Deonar,Mumbai, VOL. No. 71, Issue 1, January, 2010.

4.दै. लोकमत, दि. १५ जुलै, हॅलो नांदेड, पान क्रमांक ०२

5.परितवर्तनाचा वाटसरू, जुलै २०२०, अंक ०६

6.**दासगुप्ता, लोपा व इतर (2004): महिलांचे कुटुंबातील स्थान, महिला सबलीकरण, दारिद्रय निर्मूलन व *स्वयं-सहाय्य* बचत गट, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.**

7.**आगलावे, प्रदिप (2000): संशोधन पध्दती शास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकशन, नागपूर.**